# अंमली पदार्थ विरोधी कक्ष,
# गुन्हे शाखा, बृहन्मुंबई

**-: प्रेस नोट :-** **दिनांक - २९/०५/२०२४**

**मुंबई उपनगरात 'हेरॉईन' या अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्या ०२ आरोपीतांना अटक करुन १.१२ करोड रुपये किंमतीचा अंमली पदार्थ जप्त.**

| | | |
|---|---|---|
| **गु.र.क्र. व कलम** | :- | गु.र.क्र. २८/२०२४, कलम ८ (क) सह २१(क), २९ एन.डी.पी. एस.कायदा १९८५ |
| **दाखल दिनांक** | :- | दिनांक २८/०५/२०२४ रोजी २२:०० वा. |
| **गुन्हयाचे घटनास्थळ** | :- | बोरीवली (पू.), मुंबई. |
| **आरोपीची संख्या** | :- | ०२ |
| **जप्त मुद्देमाल व अंदाजे किंमत** | :- | एकुण २८० ग्रॅम वजनाचा 'हेरॉईन' हा अंमली पदार्थ कि.अ.रु. १,१२,००,०००/- |

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई सो. यांचे आदेशान्वये मुंबई व मुंबई उपनगरामध्ये अंमली पदार्थाची तस्करी तसेच खरेदी-विक्री करणाऱ्या इसमांचा शोध घेवुन त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यासाठी अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, गु.अ.वि, मुंबई यांचेकडुन विशेष मोहिम हाती घेण्यात आली आहे.

अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे **कांदीवली युनिटचे** पथकाने दिनांक २८/०५/२०२४ रोजी बोरीवली पुर्व, मुंबई या परिसरात प्रभावीपणे अंमली पदार्थ विरोधी कारवाई करत एकूण दोन इसमास अटक केले. अटक करण्यात आलेले दोन्ही इसम हे मुळचे उत्तराखंड राज्यातील असुन त्यांचे ताब्यातून **२८० ग्रॅम वजनाचा उच्च प्रतीचा 'हेरॉईन' एकुण किं.अं. रुपये १.१२ करोड रूपये** किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला. नमूद अटक आरोपींविरूध्द अं.प.वि.कक्ष कांदिवली युनिट गु.र.क्र. २८/२४, कलम ८ (क) सह २१ (क), २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. अटक आरोपीस दिनांक ०३/०६/२०२४ रोजी पर्यंत मा.न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. नमूद गुन्हयाचा पुढील तपास कांदीवली युनिटचे पोउनि निखील शेळके हे करत आहेत.

सदरची यशस्वी कामगिरी ही श्री. विवेक फणसळकर, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. देवेन भारती, विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री.लखमी गौतम, पोलीस सह आयुक्त(गुन्हे), श्री. शशि कुमार मीना, अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), श्री. शाम घुगे, पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई व श्री. किरण लोंढे, सहाय्यक पोलीस आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई (अति. कार्यभार) यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्ष (गुन्हे शाखा) अंतर्गत कांदिवली युनिटचे प्रभारी पो.निरी. वैभव धुमाळ यांचे नेतृत्वात कांदीवली अंमली पदार्थ विरोधी कक्षाने केली आहे.

----ooo----